बी ते डांगर प्रवास

वेन्डी



डांगराची भाजी केली जाते.
डांगर कोरून मुलं त्यापासून कंदील तयार करत.
पोषक नाष्ट्यासाठी डांगराच्या बिया भाजल्या
जातात. पण एका छोट्याश्या बी पासून एक मोठ्ठे
डांगर कसे होते? वाचा आणि माहित करून घ्या
की एका डांगराला बी पासून तयार होण्यासाठी काय
काय लागतं.

बी ते डांगर प्रवास



मराठी : अश्विनी बर्वे




जेव्हा वसंतातली हवा धरणीला करते, तेव्हा शेतकरी डांगराच्या हजारो बिया लावतात.

प्रत्येक डांगराच्या बी पासून एक छोटे डांगराचे रोप तयार होते. जमिनीत, अंधारात, उबदार मातीत लावलेले बी पासून एक छोटे रोप वाढू लागते.

जस जसं रोप मोठे होतं, बी उघडलं जातं, त्याचं वेल वर येते.मुळं जमिनीत खोलवर जातात. मुळाच्या आत एक नळी असते. या नळ्या मधून पाणी तसेच वर येते जसे स्ट्रॉ मधून सरबत.



बी पेरल्यानंतर दोन आठवड्यांनी हिरव्या रंगाचे कोंब जमिनीतून आपलं डोकं बाहेर काढतात.



हे कोंब छोट्या अंकुरात विकसित होतात.त्याची दोन पाने (बियांची पाने) वेली मध्ये रूपांतरित होतात. ती सूर्याच्या दिशेने वाढते.



सूर्याचा प्रकाश या पानांना अन्न तयार करण्याची उर्जा देतो. आपल्या सारखेच वाढण्यासाठी रोपाला अन्नाची गरज असते. पण सगळी झाडं आपल्या सारखे जेवत नाही. पानं झाडासाठी अन्न तयार करतात.



अन्न तयार करण्यासाठी रोपांना प्रकाश, पाणी आणि हवेची गरज असते. पानं उष्णता साठवतात.



रोपाची मुळं पावसाचे पाणी शोषून घेतात. आणि पानांवर असणारी छोटी छोटी छिद्रे हवा आत घेतात. सूर्यापासून मिळणाऱ्या उर्जेचा उपयोग करत, पानं मातीपासून मिळालेल्या पाण्याबरोबर हवा मिसळतात आणि साखर तयार करतात. हे झाडाचे अन्न असते.

लवकरच पसरट, काटेरी पानं वेलीवर दिसू लागतात.





काही काळा नंतर बियांची पाने वाळून जातात.
मग नवीन पाने डांगरासाठी अन्न तयार करतात.



प्रत्येक डांगराच्या वेलीत नवीन नळ्या असतात. काही नळ्या पानांपर्यंत मातीतून पाणी घेवून जाते, त्यामुळे त्या साखर तयार करू शकतील.

काही इतर नळ्यांच्या साहय्याने अन्न खाली जाते, त्यामुळे डांगराची वाढ होते.

जेव्हा दिवस मोठे आणि गरम असतात तेव्हा शेतकरी डांगरा जवळचे गवत काढून टाकतो. कारण हे गवत मातीतले पाणी शोषून घेते. डांगराचे झाड वाढण्यासाठी पाण्याची जरुरी असते.




डांगराचे झाड सरळ उभे राहत नाही.जशी वेल वाढते तशी ती आजूबाजूच्या जमिनीवर पसरते. काही काळानंतर वेल सगळ्या शेतात पसरते.





लवकरच डांगराच्या वेलीला फुलांच्या कळ्या दिसू लागतात. कळ्या उमलल्यानंतर त्याच्या नारंगी पाकळ्या मोठ्या मोठ्या होत जातात. त्या चमकणाऱ्या नारंगी छत्री सारख्या दिसू लागतात.



दिवसाच्या गरमीत फुलं मिटून जातात.



थंड रात्री आणि सकाळच्या वेळी फुलं परत फुलतात. चमकणारे नारंगी फूल, मधमाश्यांना आकर्षित करतात. मधमाश्या गुणगुणतात आणि नर फुलांना मादी फुलांच्या पिवळ्या परागकणा पर्यंत घेवून जातात. आता डांगर येवू शकतील.



मग पाकळ्या वाळून झडतात. जिथं आधी फुलं होती तिथं आता छोटे-छोटे फळं यायला लागतात. शेकडो फळं वेलीला लागतात.

दिवस गरम होतात. उन्हाळ्यात उन्हामध्ये आणि थंडी, पाऊसामुळे फळं मोठ मोठी होतात.



लवकरच उन्हाळा संपतो. डांगराच्या शेता शेजारी लावलेला मका आता भुऱ्या रंगाचा दिसू लागतो. मोठ्या झाडांची पाने लाल, नारंगी आणि पिवळ्या रंगाची होतात.





डांगराचा रंगही बदलतो. जसजसे ती पिकू लागतात त्यांचा हिरवा रंग पिवळा होत जातो, मग नारंगी होतो.

केवळ चार महिन्यांत छोटे, सपाट डांगराचे बी,
मोठे, जाड नारंगी डांगरात विकसित होत जाते.

पिकलेले डांगर, गोलमटोल होते. ते सगळ्या आकारात येते.
आता ते शरद ऋतूमधल्या सूर्याची वाट पाहते.





अमेरिकेत हॅलोविनचा सण असतो. लोक हॅलोविनला डांगर कोरून त्यापासून कंदील तयार करतात.




थँक्सगिविंग या सणाला डांगर शिजवून एक विशेष मिठाई ‘पाय’ तयार केली जाते.



आता डांगराची रंगीत पाने भुऱ्या रंगाची होतात. थंडीत हवा सुटते, आणि लवकरच पाने झडू लागतात. पानं झडल्याने झाडं नंगी होतात. शेतकरी जेव्हा डांगराच्या शेताकडे बघतो तेव्हा त्याला फक्त राहिलेल्या काही मेलेल्या वेलीच दिसतात.



पण वसंतात जेव्हा हवा धरतीला परत गरम करेल, तेव्हा शेतकरी परत एकदा शेकडो डांगराच्या बिया पेरेल आणि परत एकदा ती वाढतील-बी पासून डांगरा पर्यंत.



समाप्त